**ಕರ್ನಾಟಕ ಪ್ರೌಢಶಿಕ್ಷಣ ಪರೀಕ್ಷಾ ಮಂಡಳಿ**
ಮಲ್ಲೇಶ್ವರಂ, ಬೆಂಗಳೂರು–560003.

**KARNATAKA SECONDARY EDUCATION EXAMINATION BOARD**
Malleshwaram, Bengaluru – 560003.

**2021-22 ಸಾಲಿನ ಮಾದರಿ ಪ್ರಶ್ನೆ ಪತ್ರಿಕೆ - 1**
**2021 -22 MODEL QUESTION PAPER - 1**

**ವಿಷಯ : ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ** | **ವಿಷಯ ಸಂಕೇತ : 08-M**
**Subject : FIRST LANGUAGE MARATI** | **Subject Code : 08-M**
**ಅವಧಿ : 3 ಗಂಟೆ 15 ನಿಮಿಷ** | **ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 100**
**Time : 3 hrs. 15 minutes** | **Max. Marks : 100**

**ಶಾಲಾ ಅಭ್ಯರ್ಥಿಗಳಿಗೆ**
**Regular Fresh**

---

## विद्यार्थ्यांना सामान्य सूचना :

1) प्रश्न पत्रिकेमध्ये बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ प्रकारचे 45 प्रश्न आहेत.

2) प्रश्न पत्रिका विरुद्ध बाजूच्या आच्छादनाने सील (बंद) करण्यात आली आहे. परीक्षा सुरु झाल्यावर उजव्या बाजूने कापून तुम्हाला ती उघडावयाची आहे. प्रश्न पत्रिकेमधील सर्व प्रश्न व्यवस्थित आहेत की नाहीत ते तपासून पाहा.

3) बहुपर्यायी आणि वस्तुनिष्ठ या दोन्ही प्रकारच्या प्रश्नांसाठी दिलेल्या सूचनांने पालन करा.

4) उजव्या बाजूच्या कडेला (काठावर) असलेली संख्या पूर्ण गुण दर्शविते.

5) पेपरची उत्तरे सोडविण्यासाठी दिलेला जास्तीत जास्त वेळ प्रश्न पत्रिकेच्या पृष्ठावर वरील भागात दिलेला आहे. त्यामध्ये प्रश्न पत्रिका वाचण्यासाठी 15 मिनिटेही दिलेली आहेत.

I. **खालील प्रश्नांना प्रत्येकी चार पर्याय दिले आहेत त्यापैकी योग्य पर्याय निवडून उत्तर लिहा. 6 x 1 = 6**

1. **'विद्यार्थी' या संधीयुक्त शब्दाचा विग्रह असा होतो –**

   अ. विद्या + आर्थी

   ब. विद्या + अर्थी

   क. विद्य + अर्थी

   ड. विध्या + अर्थी

2. **तृतीया विभक्तीचे प्रत्यय हे आहेत –**

   अ. नो

   ब. स, ला, ते

   क. ने, ए, शी

   ड. चा, ची, चे

3. **आपली गरज संपली की उपकार कर्त्याला विसरणे या अर्थाची म्हण –**

   अ. गर्जेल तो पडेल काय

   ब. आयत्या बिळात नागोबा

   क. अतिशहाणा त्याचा बैल रिकामा

   ड. गरज सरो वैद्य मरो

4. **'पंचवटी' हा शब्द या समासाचे उदाहरण आहे –**

   अ. द्विगू

   ब. अव्ययीभाव

   क. कर्मधारय

   ड. मध्यमपदलोपी

5. **खालीलपैकी विशेषनाम ओळखा –**

   अ. पर्वत

   ब. हुशार

   क. भरभर

   ड. गणेश

6. **'सफल' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा –**

   अ. फल

   ब. वफल

   क. असफल

   ड. अफल

**II. पहिल्या दोन पदातील संबंध ओळखून तिसऱ्या पदाचा योग्य संबंध लिहा – 4 x 1 = 4**

7. पोलीसांनी चोरास पकडले : भावे प्रयोग :: महेश अभ्यास करतो : ........................

8. मी निबंध लिहिला असेन : भविष्यकाल :: तो मुलगा खेळत आहे : ...........................

9. समाजाची सेवा करणारा : समाजसेवक :: दररोज प्रसिद्ध होणारे : ..............................

10. देऊळ : मंदिर :: पुत्र : ................................

**III. पुढील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. 7 x 1 = 7**

11. शेपूट पाहणाऱ्यास हत्ती कसा वाटला ?

12. लेखकाने छत्री किती रूपयांना विकत घेतली ?

13. तात्यांच्या घरी पंचमंडळी का जमली होती ?

14. पाहुणे म्हणून घरी कोण यावे असे कवीला वाटते ?

15. भला जन्म हा या कवितेचे मूल्य कोणते ?

16. सत्कार कोणाचा होत आहे ?

17. रुक्मिणीच्या गुरुचे नाव काय ?

**IV. खालील प्रश्नांची उत्तरे सुचनेप्रमाणे लिहा.** **3 x 2 = 6**

18. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा.

अ) काबीज करणे

ब) विराजमान होणे

19. अलंकार ओळखून लक्षणे लिहा.

शिवाजी महाराज सिंहासारखे शूर होते.

20. गण पाडून वृत्त ओळखा.

सदा सर्वदा योग तुझा घडावा.

**V. खालील प्रश्नांची उत्तरे दोन-तीन वाक्यात लिहा.** **7 x 2 = 14**

21. आंधळयानी हत्तीचे वर्णन कसे केले आहे?

22. दुकानदाराला आश्चर्य का वाटले?

23. मंग पोटापाण्याचं कसं करताव? संदर्भासहित स्पष्टीकरण द्या.

24. गंगूबाईना कोणकोणत्या पुरस्कार आणि उपाधीने सन्मानित करण्यात आले?

25. संत ज्ञानेश्वर यांचा परिचय लिहा.

26. श्रीकृष्णाच्या प्राप्तिसाठी रुक्मिणीने काय काय प्रयत्न केले?

27. भूके जीव काय-काय करतील असे कवी म्हणतो?

**VI. खालीलपैकी कोणत्याही एका कल्पनेचा विस्तार करा.** **1 x 3 = 3**

28. अ) ग्रंथ हेच गुरु

ब) प्रयत्नांती परमेश्वर

**VII. खालील प्रश्नांची उत्तरे पाच–सहा वाक्यात लिहा –** **10 x 3 = 30**

29. माणकर, आंजूरकर आणि मोरे सरदारांनी काय केले ?

30. सावित्रीबाई शिक्षिका म्हणून शाळेत जाऊ लागल्यावर लोकांनी कोणत्या प्रतिक्रिया दर्शविल्या ?

31. बेळगावी काँग्रेस अधिवेशनाचे वर्णन करा.

32. विद्येसाठी आंबेडकरांनी कोणकोणते कष्ट घेतले ?

33. पाहुण्यांच्या वर्तनाने आई का कंटाळून गेली ?

34. होमामध्ये काय–काय जाळतात ?

35. पृथ्वीचे प्रेम मिळावे म्हणून कोण कोण कशाप्रकारे याचना करीत आहेत ?

36. मातीची मृत्यूवर मात म्हणजे काय ?

37. 'मदर्स युनियन' या संस्थेची माहिती लिहा.

38. धरण कवितेतील स्त्रीच्या गरीब परिस्थितीचे वर्णन करा.

**VIII. खालील प्रश्नांची उत्तरे आठ–दहा वाक्यात लिहा** **4 x 4 = 16**

39. हिरवे सांगाती या पाठातील सर्व वृक्षांची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

**किंवा**

हिरवे सांगाती या शीर्षकाची यथार्थता स्पष्ट करा.

40. लेखकाने काकूंना कामावरून का काढून टाकले ? सविस्तर लिहा.

**किंवा**

काकूचे स्वभावचित्र तुमच्या शब्दात् लिहा.

41. भारत कशा प्रकारे असावा अशी संत तुकडोजीनी अपेक्षा केली आहे ?

42. **पुढील कवितेच्या ओळी पूर्ण करा :**

संगरी वीराग्रणी जे ......................................................

.......................................................................................

.......................................................................................

....................................................... तष्करांनी वेढीले।

**किंवा**

संभ्रमी त्या जाहले ......................................................

.......................................................................................

.......................................................................................

....................................................... देशही सामावती।

**IX. पुढे दिलेला उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा.** **2 x 2 = 4**

43. आळशी माणूस हा सतत आरामाची अपेक्षा करत असतो. तर खरा काम करणारा माणूस 'आराम हराम है 'असे मानतो. रात्रीची पाच-सहा तास झोप ही विश्रांतीसाठी पुरेशी असते. इतरवेळी त्याने सतत् काम करत राहावे. उगाचच बसून राहिल्याने अंगात आळस वाढतो. उलट प्रत्येकाने हे लक्षात ठेवले पाहिजे की, काळ सतत पुढे जात असतो. तो कोणासाठीही थांबत नसतो. आपण तो काळ व्यर्थ द्वडला तर आपला कार्यभाग साधणार नाही. सतत तेच-तेच काम करत राहिल्यास कंटाळा येतो. म्हणून तर सहा दिवस काम केल्यावर रविवारी सुट्टी येते. त्या दिवशी आळसात लोळत पडण्यापेक्षा माणसाने छंदात रमून जावे.

प्रश्न : 1) आळशी माणूस व खरा कष्टकरी माणूस यातील फरक काय?

2) काळ व्यर्थ जाऊ नये म्हणून माणसाने काय करावे?

**X. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पत्रलेखन करा –** **1 x 5 = 5**

44. अभ्यासाचे महत्व पटवून देणारे पत्र तुमच्या लहान भावास लिहा.

**किंवा**

तुमचा शाळा सोडल्याचा दाखला मिळवण्यासाठी मुख्याध्यपकांना विनंती अर्ज लिहा.

**XI. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर पंधरा ते वीस ओळी निबंधलेखन करा –** **1 x 5 = 5**

45. अ) राष्ट्रीय सण

ब) मोबाईल फायदे तोटे